**विषय :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती, अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतूदीनुसार ***"मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन".***

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

" सामान्य प्रशासन विभाग "

जावक क्रमांक : साप्रवि/आस्था-६/ २८१ /२०१७.

नाशिक, दिनांक : २६/०५/२०१७.

**वाचा :** ०१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१).

०२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची मंजुर टिप्पणी दि. /०५ /२०१७.

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतूदीनुसार प्रदान करणेत आलेल्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांपैकी काही महत्वाचे अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करण्यात येत आहे. प्रत्यायोजन कार्यपध्दती बाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे. केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत **शासकीय ध्वजांकित योजना उदा. स्वच्छ भारत मिशन, शबरी योजना, इंदिरा आवास योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, पंडित दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना, संसद आदर्श ग्राम योजना, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना, रमाई घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम** या सारख्या महत्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी प्रभावी तालुका पातळीवर होत नसल्याचे निर्देशनास आले आहे. या योजनांचे उदिष्ट पूर्तीसाठी गट विकास अधिकारी, पंचासत समिती (सर्व) यांना आदेशाच्या दिनांकापासून खालील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नियम (३) नुसार मला जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत असलेल्या वर्ग-३ व वर्ग-४ अधिकारी / कर्मचारी यांना पदावरुन तात्पुरते दूर करण्याचा (निलंबन) अधिकार आहे.

उक्त नियम व तरतुदी नुसार मला असलेला अधिकार मी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) तरतुदीनुसार गटस्तरावरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अधिकारी/कर्मचारी यांचे बाबतीत संबंधीत गटविकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती (सर्व) यांना गटस्तरवरील कामकाजात सुसुत्रता व गतिमानता आणण्याच्या दृष्टीने प्रत्यायोजन / प्रदान करीत आहे.

**सदरच्या अधिकाराचा वापर करतांना खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.**

१. निलंबन केलेल्या संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना निलंबन कालावधी आपल्या तालुक्यातंर्गत मुख्यालय देणे शक्य आहे. त्यांना आपल्या तालुक्यातच मुख्यालय देण्यात यावे. मात्र ज्या अधिकारी/कर्मचारी यांना तालुक्यातंर्गत मुख्यालय देणे शक्य होणार नाही त्यांना मुख्यालय देण्यासाठीचा प्रस्ताव निलंबन दिनांकालाच या कार्यालयास सादर करावा.

२. निलंबन केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे कर्तव्य कसुरी प्रकरणे परिशिष्ठ १ ते ४ (दोषारोप पत्र) आवश्यक त्या पुराव्याच्या स्वाक्षांकित कागदपत्रासह खाते चौकशी कामी ८ दिवसात संबंधीत कर्मचा-यांच्या आस्थापना विभाग प्रमुखाकडे सादर करावे.

३. निलंबन केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना पुर्नस्थापित करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणून सर्वस्वी मला राहतील.

४. मात्र निलंबनाची कारवाई करतांना ती हेतूपुरस्करपणे सुड बुध्दीने/आकसाने होणार नाही यांची दक्षता गट विकास अधिकारी(उ.श्रे),पंचायत समिती यांनी घ्यावी.

५. गट विकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती यांनी एकतर्फी हेतुपुरस्करपणे निलंबनाची कार्यवाही केली असे माझ्या निर्देशनास आल्यास अशा प्रकरणामध्ये संबंधीत गट विकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती यांना जबाबदार धरण्या येईल. तसेच सदरच्या अधिकाराचा दुरुपयोग होणार नाही यांची विशेष काळजी घेण्यात यावी.

वरील प्रमाणे प्रदान करणेत आलेल्या अधिकारांमध्ये कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव बदल करणेची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे. प्रस्तुत आदेश "**स्थायी आदेश**" संचिकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी, आदेशाच्या दिनांकापासुन करण्यांत यावी.

Deepa... 25/05

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर.**
१. मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
२.मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
३.मा.सभापती, विषय समिती -----------------, जिल्हा परिषद, नाशिक.
**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**
१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह परिषद, नाशिक.
२.खाते प्रमुख (सर्व), ......................, जिल्हा परिषद, नाशिक.
३.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
४.सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
५.गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
६.उप अभियंता (ल.पा./इवद/ग्रापापु), जि.प.उपविभाग (सर्व) ........................
७.वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) ........................
८.बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.यो.(सर्व) ........................
**प्रत : कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.**